दि महाराष्ट्र मंत्रालय ॲण्ड अलाइड ऑफिसेस को. ऑप. बँक लि. (मॅको बँक), मंत्रालय शाखा यांना मंत्रालय आवारात जागा वाटप करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः शाकाजा-१११२/प्र.क्र.६४/२०१२/२२

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
तारीख: ०५ फेब्रुवारी, २०१८

<u>प्रस्तावना :</u>

दि महाराष्ट्र मंत्रालय ॲण्ड अलाइड ऑफिसेस को. ऑप. बँक लि. (मॅको बँक), मंत्रालय शाखा ही मंत्रालय इमारतीच्या आवारात, मुख्य इमारत पश्चिमेकडील बाजूस एक मजली इमारतीमध्ये कार्यरत होती. दि.२१-६-२०१२ रोजी मंत्रालय इमारतीस लागलेल्या आगीनंतर दि महाराष्ट्र मंत्रालय ॲण्ड अलाइड ऑफिसेस को. ऑप. बँक लि. (मॅको बँक), मंत्रालय शाखा यांना मनोरा आमदार निवास येथील 'ब' व 'क' इमारतीच्या तळमजल्यावरील दवाखान्यासमोरील ८४८.३१ चौ.फूट इतक्या क्षेत्रफळाची जागा तात्पुरत्या स्वरुपात वाटप करण्यात आली आहे. सदरची जागा ही बँकेच्या प्रशासकीय, व्यवहाराच्या दृष्टीने तसेच ग्राहकांच्या दृष्टीने अत्यंत गैरसोयीची आहे. नजीकच्या काळात मनोरा आमदार निवास इमारतीच्या पुर्नविकासाचे काम हाती घेण्यात येणार आहे. तसेच, रिजर्व्ह बँकेने दि महाराष्ट्र मंत्रालय ॲण्ड अलाइड ऑफिसेस को. ऑप. बँक लि. (मॅको बँक) यांना मंत्रालयाच्या आवारात शाखा कार्यान्वित करण्याकरीता परवाना दिलेला आहे. यानुषंगाने दि महाराष्ट्र मंत्रालय ॲण्ड अलाइड ऑफिसेस को. ऑप. बँक लि. (मॅको बँक), मंत्रालय शाखेकरीता जागा वाटप करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

तसेच, सामान्य प्रशासन विभाग कार्यासन-२१, २१-अ व २१ रोख शाखा या कार्यासनांच्या ताब्यातील सामान / अभिलेख व इतर सामुग्री ठेवण्याकरीता ६०० चौ.फूट जागा वाटप करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुषंगाने आता शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

शासन निर्णय:

मंत्रालय मुख्य इमारत तळमजला येथील बँक ऑफ महाराष्ट्राच्या कार्यालयासाठी ५६७.८७ चौ.फू. जागा वाटप करण्यात आली आहे. बँक ऑफ महाराष्ट्राच्या जागे शेजारील ६०० चौ.फूट जागेस प्रवेशद्वार करता येणे शक्य नसल्यामुळे सदरची जागा रिक्त ठेवण्यात आली आहे. या रिक्त ठेवलेल्या जागे शेजारील १२५० चौ.फू. जागा दि महाराष्ट्र मंत्रालय ॲण्ड अलाइड ऑफिसेस को. ऑप. बँक लि. (मॅको बँक), मंत्रालय शाखा यांना वाटप करण्यात येत आहे. तसेच, सामान्य प्रशासन विभाग कार्यासन-२१, २१-अ व २१ रोख शाखा या कार्यासनांच्या ताब्यातील सामान / अभिलेख व इतर सामुग्री ठेवण्याकरीता मॅको बँकेस वाटप करण्यात आलेल्या १२५० चौ.फूट जागे शेजारील ६०० चौ.फूट जागा वाटप करण्यात येत आहे.

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर (सा.बां.) विभाग, बांधकाम भवन, मुंबई यांनी उपरोक्त जागेचा ताबा संबंधितांना द्यावा व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०५१४२३५२६५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Siddharth Narayan Mahire

Digitally signed by Siddharth Narayan Mahire
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6080d590875f4df1f7dcb35be19ac7ff9f4f49ed8280e3c3685c7591ddead257, cn=Siddharth Narayan Mahire
Date: 2018.02.05 14:30:54 +05'30'

(सि. ना. महिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सर्व सन्माननीय विधानसभा/परिषद व संसद सदस्य
२. मा.सभापतींचे सचिव/मा.अध्यक्षांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधान मंडळ, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिवांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
५. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.
७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.
९. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. सह सचिव (का.२२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, दि महाराष्ट्र मंत्रालय ॲण्ड अलाइड ऑफिसेस को. ऑप. बँक लि. (मॅको बँक), मंत्रालय शाखा, मनोरा आमदार निवास, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई-२१.
१२. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर (सा.बां.) विभाग, बांधकाम भवन, २ रा मजला, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-०१.
१३. उप अभियंता, दक्षिण उपविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, एम.टी.डी.सी.समोर, मुंबई.
१४. शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय आवार, तळमजला, मुंबई-३२.
१५. निवडनस्ती.